ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# स्वंयरोजगारः बेरोजगारीवर सर्वोत्तम उपाय

**डॉ. कविता आर. बोरकर**
सहयोगी प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर

आज आपल्या देशापुढे ज्या अनेक समस्या आहेत. 'बेकारी' त्यातली एक महत्त्वाची समस्या आहे. कोट्यावधी तरूण माणसे बेकार आहेत. त्यात सुशिक्षीत तरूण आहेत. त्याचप्रमाणे अशिक्षितही तरूण आहेत. कुशल निपूण माणसे बेकार आहेत. त्याच प्रमाणे लाखो अकुशल माणसेही कामाविना आहेत अशी ही काम नसलेली माणसे समाजाला घातक ठरतात. कारण रिकामे डोके, रिकामे हात हे नको त्या गोष्टी करण्यास प्रवृत्त होतात. अशा बेकार मंडळीतून गुन्हेगारी वाढत जाते. आपल्या देशासमोर आजमितीस ज्या अनेक समस्या आहेत त्यात एक गंभीर समस्या आहे जीवघेण्या बेरोजगारीची. देशातील विविध सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणी झालेल्या बेरोजगारांची संख्या अंदाजे 4 कोटीच्या वर आहे. अनेक राज्यात सेवायोजना कार्यालये सुरू केली असून, त्या राज्यातील सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या तरूणांची संख्या लाखोंच्या घरात आहे. महाराष्ट्रात नोंदणी झालेल्या बेरोजगारांची संख्या जवळजवळ 43 लाख एवढी आहे. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यात अशी परिस्थिती आहे. तरूण मुले सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करून, सेवायोजन कार्यालयाकडे डोळे लावून नोकरीच्या प्रतिक्षेत वर्षानुवर्षे बसलेली पाहावयास मिळतात. ज्या उमेदीच्या काळात कष्ट करण्याची जास्तीत जास्त क्षमता असते नेमका तोच काळ तरूणांना प्रतिक्षेपोटी वर्षानुवर्षे खर्ची घालवा लागतो. देशाच्या युवाशक्तीचा अशाप्रकारे ऱ्हास ही हृदय पिळवटून टाकणारी बाब आहे.

भारतातील 'लोकसंख्येचा विस्फोट' हे या बेकारीचे एक कारण आहे. उपलब्ध नौकऱ्यांपेक्षा बेकारांची संख्या फार मोठी आहे, हे बेकारीचे एक कारण आहे. सरकारी नौकरी करायची, महिना संपला की, निश्चित वेतन घ्यायचे आणि निवृत्तीचे वय झाले की, निवृत्ती वेतन घेऊन आराम करीत बसायचे हे सुखासिन जगणे सर्वांना हवेहवेसे वाटते. त्यामुळेच प्रत्येक जण आपल्याला कायमची हमी देणारी नौकरी मिळावी असा प्रयत्न करतो. आता हे स्पष्ट झाले आहे की, मागणी इतक्या नौकऱ्या उपलब्ध नाहीत. तेव्हा नौकरी शोधण्यात वेळ घालवण्याऐवजी प्रत्येकाने स्वंयरोजगाराचा विचार करावा. आपण नौकरी शोध हिंडण्याऐवजी आपण असा रोजगार सुरू करावा की, आपणच चार जणांना नोकरी देऊ शकु. एक लक्षात ठेवावे की, जेथे इच्छा आहे तेथे मार्ग नक्की मिळु शकतो.

अनेक जण व्यवसाय म्हटला की, भांडवलाचा बाऊ उभा करतात, कारण त्यांच्या डोळ्यासमोर असतात मोठे—मोठे उद्योजक, पण हे उद्योजक एकदम मोठे झाले नाहीत. त्यांनी आपली सुरूवात केली ती शुन्यातुनच तेव्हा स्वंयरोजगार सुरू करण्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज नसते, तर गरज असते ती मोठ्या जिद्दीची. बेकारीला कंटाळुन चुकीच्या वा आत्मघाताच्या मार्गाकडे वळण्याऐवजी असा एखादा स्वंयरोजगार शोधावा हे लक्षात घ्यावे की, कोणताही रोजगार, कोणतेही काम हे कनिष्ठ प्रतीचे नसते. फक्त ते काम प्रामाणिकपणे व निष्ठेने केले पाहिजे. नौकरी करणे म्हणजेच प्रतिष्ठेचे काम ही चुकीची कल्पना पुसुन टाकली पाहिजे. स्वंयरोजगार ही उत्तम आयुष्य जगण्यासाठी सुवर्णसंधी आहे असे मनापासून मानले पाहिजे. कारण तीच काळाची गरज आहे.

शिक्षणानंतर सर्वच जन नौकरीच्या शोधात असतात. पण पुष्कळदा तुम्हाला तुमच्या शैक्षणिक योग्यतेची नौकरी मिळत नाही. अशा परिस्थितीत स्वंयरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. स्वंयरोजगार या शब्दाचा अर्थ स्वतःच स्वतःसाठी रोजगार उपलब्ध करणे आणि त्याद्वारे अर्थाजन करणे असा होतो. नौकरी न करता स्वंयरोजगाराचा मार्ग पत्करणाऱ्यांची खरे तर संख्या खुप कमी आहे. याचे एक कारण म्हणजे समाजामध्ये स्वंयरोजगाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन तितकासा सकारात्मक नाही. त्यामुळे आणि योग्य माहिती अभावी आजही स्वंयरोजगारापेक्षा नौकरीलाच प्राधान्य दिल्या जाते. खरे तर योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमाची जोड मिळाल्यास स्वंयरोजगाराच्या माध्यमातून नौकरी पेक्षा कितीतरी जास्त आर्थिक विकास साध्य करणे शक्य आहे. याशिवाय स्वंयरोजगाराच्या माध्यमातून स्वतःबरोबरच इतरांसाठीही रोजगाराची संधी निर्माण करणे शक्य आहे. त्यामुळे तुम्ही स्वतःच्या आर्थिक विकासासोबत इतरांच्या आर्थिक विकासात हातभार लावू शकला. म्हणून कुठलाही न्युनगंड न बाळगता स्वंयरोजगाराचा मार्ग अवलंबण्यात काहीच गैर नाही. स्वाभीमानाने स्वतःचा आर्थिक विकास साधायचा असेल तर स्वंयरोजगारासारखा दुसरा चांगला मार्ग नाही. स्वंयरोजगारासाठी कोणताही व्यवसाय हा त्या

त्या व्यक्तीची आवड, त्याला मिळालेली संधी, त्याच्याकडे असलेले भांडवल यावर अवलंबुन असते. ज्याला स्वंयरोजगार सुरू करण्याची इच्छा असते त्याने स्वतःच प्रयत्न करायचा असतो. काही काही वेळेला तर काही वेळेला अपयशही पदरी पडते. परंतु, व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतेही रेडिमेड व्यवस्था नसते. काम करता करता शिकणे आणि शिकता शिकता काम करणे हाच त्यातला उत्तम मार्ग असतो. कधी कधी जो व्यवसाय आपल्याला करायचा आहे त्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणे कठिण जाते. अशावेळी आपल्याला जो व्यवसाय करावयाचा आहे त्याचे प्रशिक्षण कोठे मिळते याची माहिती मिळविणे आवश्यक असते. प्रशिक्षणामध्ये शिकता शिकताच अनुभवही मिळतो. त्यामुळे त्याचा प्रत्यक्ष व्यवसाय सुरू करतांना फायदाच होतो.

सरकार तर्फे काही व्यवसायाभिमुख स्वरूपाचे अभ्यासक्रम शिकविले जातात. त्याचप्रमाणे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवसाय सुरू करण्यासंबंधी मार्गदर्शनही दिले जाते. सरकार तर्फे व्यवसायासाठी कर्ज सुविधा उपलब्ध असतात. त्या कशा मिळवाव्यात या संबंधीची माहितीही दिली जाते. आज काल स्वंयसेवी संस्थाही व्यवसाय करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या तरूणांना मार्गदर्शन करतात. काही ठिकाणे व्यवसाय मार्गदर्शन केंद्रही असतात. जी आपल्याकडुन लोकांना योग्य ती माहिती पुरविण्याच काम करतात. त्यामुळे एकुणच असे म्हणता येईल की, ज्याला मनापासून व्यवसाय करण्याची इच्छा आहे त्याला अनेक मार्ग सापडतात पण तिथपर्यंत पोहचता आले पाहिजे.

**स्वंयरोजगाराचे फायदे :**

स्वयंरोजगाराचा सर्वात लक्षणीय फायद्यांपैकी एक म्हणजे मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य आणि लवचिकता हे व्यक्तीला आपल्या आवडीच्या गोष्टी करण्याची परवानगी देते, योग्य कामाचे तास ठरवते, कोणते काम करायचे किंवा करू नये हे ठरवते आणि बरेचदा काम करणे समाविष्ट असते. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात येणारा वेळ वाचतो.

स्वंयरोजगाराच्या फायद्यामध्ये उच्च प्रमाणात स्वातंत्र्य, स्वातंत्र्य आणि व्यवसाय निर्णयावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असणे समाविष्ट आहे. तरीही अडचणीच्या मध्ये उच्च प्रमाणात रोजगार जोखीम आणि अस्थिर उत्पन्न, तसेच अमर्यादित दायित्व आणि सर्व व्यावसायीक नुकसानाची जबाबदारी घेणे समाविष्ट आहे.

**बेरोजगारी निमूलनाचे उपाय :**

**1) रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शक केंद्र :**

प्रत्येक जिल्ह्यात बेरोजगार उमेदवारांची नोंदणी तसेच त्यांना स्वंयरोजगाराकरिता मार्गदर्शन करण्यासाठी रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रे स्थापन केले आहेत. राज्यात 35 जिल्ह्यात रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रे, 6 विद्यापीठस्तरीय रोजगार व स्वंयरोजगार केंद्रे, अनुसूचित जमाती करित 8 प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र आणि शारिरीकदृष्ट्या अपंग व्यक्तीकरिता एक विशेष केंद्र कार्यरत आहे.

**2) रोजगार प्रोत्साहनाकरिता कार्यक्रम :**

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम सुशिक्षीत बेरोजगार व्यक्तीस प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण अथवा इतर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम, काम शिकण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगास प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम शिक्षण घेतलेल्या बेरोजगार युवकांना स्वंयरोजगारासाठी प्रेरित व प्रशिक्षित करणे.

**3) रोजगार मेळावे :**

2009—2010 पासून राज्यसरकारने उद्योगांना कुशल मनुष्य बळ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये रोजगार मेळावे आयोजनास सुरूवात केली. या योजने अंर्तगत उद्योजक व नोकरी उत्सुक उमेदवार यांना एकत्र आणून उद्योजकांना आवश्यक असलेले मनुष्यबळ विनामुल्य उपलब्ध करून देणे व उमेदवारांना नोकरीसाठी मदत केली जाते.

**4) कौशल्य विकास :**

प्रतिदिन वाढत असलेल्या मनुष्यबळास कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांच्या सर्वांगिण कौशल्यामध्ये वाढ करणे, हा या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते.

**5) मनरेगा :**

MGNREGA (मनरेगा) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयांतर्गत सुरू असलेले या योजनेत यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांचा हिस्सा जास्त आहे.

**6) आदिवासी युवकांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व मार्गदर्शन :**

प्रशिक्षण केंद्राद्वारे आदिवासी तरूणांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणे व व विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून

घेण, तसेच त्यांच्यात उपजत क्षमतांचा शोध घेण्यास मदत करण्यात येते.

**7) सेवा सोसायटी :**

रोजगाराभिमुख उमेदवारांचा सहकारी सेवा संस्था स्थापन करून त्यांना आर्थिक मदत मिळवून देणे आणि शासकीय, निमशासकिय तसेच खाजगी क्षेत्राकडील कामे त्यांना मिळवून देऊन वाढती बेरोजगारी कमी करण्याचा हा एक नावीण्यपूर्ण उपक्रम आहे. सहकारी संस्था अधिनियम1959 अंतर्गत सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नावनोंदणी केलेल्या किमान 11 उमेदवारांची गरज असते.

**8) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :**

हा केंद्रपुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये 2008—2009 पासून राबविण्यात येत आहे. शहरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्याकरीता पारंपारिक कारागीर बेरोजगार युवकांच्या स्वंयरोजगार उद्योगांची उभारणी करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि कारागिरांच्या मजुरी मिळविण्याच्या क्षमतेत वाढ करून रोजगारांच्या संधी वाढविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

**9) स्वर्णजयंती ग्राम/शहरी स्वरोजगार योजना :**

1 एप्रिल 1999 रोजी ही योजना सुरू झाली. ग्रामिण युवकांना स्वरोजगार उपलब्ध करून देणारी ही योजना आहे. याशिवाय राज्यशासन केंद्रपुरस्कृत असणारी स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना देखील राज्यात राबवित आहे. ही योजना 75—25 या अनुदान प्रमाणात राबविली जाते. शहरी दारिद्र निर्मूलनाकरिता ही योजना आहे.

**10) हुनर से रोजगार तक :**

ही योना 2009 मध्ये पर्यटन मंत्रालयाने 18 ते 25 वयोगटातील आणि किमान 8 वी उत्तीर्ण तरूणांसाठी सुरू केली. सेवाक्षेत्रात रोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण दिले जाते.

**11) महात्मा गांधी राष्ट्रोय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमः**

राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये 33 राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 'हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी अधिनियम' या नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम व महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना (रोहया) यांची एकत्रित योजना होय. ही योजना कायदेशीर हक्क दृष्टिकोनावर आधारित आहे. या अंतर्गत ज्या कुटूंबातील प्रौढ व्यक्ती अकुशल कामकरण्यास इच्छुक आहे, अशा कुटूंबाला आर्थिक वर्षात किमान 100 दिवस हमीचा रोजगार केंद्राच्या निधीतून 100 पेक्षा जास्त दिवसांवरील मजुरीचा खर्च राज्यसरकार करते. या योजनेत महिलांचा 33 टक्के सहभाग असणे बंधनकारक आहे.

**12) कृषी क्षेत्राचा विकास :**

भारतातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय हा शेती आणि कृषी व्यवसायाशी संबंधित आहे. देशातील असंख्य बेरोजगार हे ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे शेती क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. कृषी व्यवसायाला विकास करण्याच्या दृष्टिने सुधारित साधनांचा उपयोग करून आधूनिक पद्धतीने शेती करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रांशी संबंधीत उद्योगांचा विकास व्हावा कृषी व्यवसायाचा विकास झाल्यास ग्रामीण लोकांना रोजगार उपलब्ध होईल तसेच ग्रामिण भागातील लोक रोजगाराकरिता शहरात स्थलांतर करणार नाहीत त्यामुळे शहरी भागातील बेरोजगार लोकांची संख्या वाढणार नाही.

**13) बचतीस प्रोत्साहन :**

देशाच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी तसेच मोठ्या उद्योगधंद्याचा विकास करण्यासाठी प्रचंड प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. लोकांनी अधिक प्रमाणात बचत केल्यास गुंतवणूक करणे शक्य होईल. परंतु, लोकांना बचतीची सवय नाही लोकांना मोठ्या प्रमाणात बचत करण्याकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे.

**निष्कर्ष :**

सामाजिक स्तरावर शिक्षण संस्थांनी रोजगाराभिमुख शैक्षणिक प्रकल्प, अभ्यासक्रम राबवावेत यासाठी शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन व अनुदान दिले जात आहेत. स्थानिक उद्योग, कारखाने, कंपनी यांच्या सोबत सहयोग अथवा करार करून शैक्षणिक संस्थांनी उद्योजकताप्रधान अभ्यासक्रम राबवावेत अशाही योजना राबविल्या जात आहे. बेरोजगारी समस्येचे निर्मूलन होण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण हा एक घटक महत्त्वाचा आहे. तसेच वैयक्तिक पातळीवर विशेष प्रशिक्षण प्राप्त करणे, व्यवसायाभिमुख कौशल्य प्राप्त करणे, सदैव नवीन काम करण्यास तयार असणे अशी उत्साही मनोवृत्ती, सकारात्मक मनोवृत्ती जोपासणे आवश्यक आहे. देशातील सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एकत्रित येऊन बेरोजगारांच्या संदर्भात एक राष्ट्रीय धोरण ठरवावे. राष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी शासनाने करावी. बेरोजगारीच्या राष्ट्रीय धोरणास सर्व राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी पाठिंबा द्यावा. हे उपाय फक्त कागदोपत्री न राहता या उपायांची योग्य अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता आहे. बेरोजगारीचे निर्मूलन झाल्यास देशात दारिद्र्याची समस्या राहणार नाही. त्यामुळे देशाचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकास योग्यप्रकारे करणे सहज शक्य होईल. अशा विविध प्रकारे

उपाय अंमलात आणून आपण बेकारांना स्वंयरोजगार करण्यास प्रोत्साहन व मार्गदर्शन करू शकतो.

**संदर्भ सूची :–**


1. *एस. टी. दाभाडे, माहिती तंत्रज्ञान आणि स्वंयरोजगार प्रकाशक : शिवा घुगे प्रभात प्रकाशन 19–1/5, लोकमान्य टिळक नगर, हिंद सायकल रोड, वरळी, मुंबई*
2. *डॉ. सुरेश सोमकुवर, भारतीय समाजः संरचनात्मक प्रश्न प्रकाशकः संजय ठाकरे सर साहित्य केंद्र गणराज्य अपार्टमेंट, राजापेठ बस स्टॉप हुडकेश्वर रोड, नागपूर*
3. *आगलावे प्रदिप, आगलावे सरोज, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जुलै–2018*
4. *पांडे दया, भारतीय समाज संरचनात्मक समस्या विश्व पब्लिशर्स एण्ड, डिस्ट्रिब्युटर्स नागपूर ऑगस्ट 2018*